जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -४९६ दिनांक - ०६/०७/२०२३**

## लोणीकाळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर

### सराईत गुन्हेगार शुभम संजय धुमाळ यास पुणे जिल्हयातुन दोन वर्षा करीता केले तडीपार

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार,यांनी पुणे पोलीस आयुक्तालयातील परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये त्याचप्रमाणे पुणे शहरातील जनतेचे रक्षण व्हावे तसेच कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडु नये त्याचप्रमाणे पुणे शहरातील टोळी गुन्हेगार, बेकायदेशीर धंदे करणारे, अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट चालविणारे, पोलीस अभिलेखावरील टोळीतील गुंड, दरोडा, जबरी चोरी, घर फोडी चो-या करणारे तसेच शरीर व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत करणारे सराईत गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांचे हालचालींवर नजर ठेवुन त्यांचे विरुध्द कठोर कारवाई करुन त्यांचे समुळ उच्चाटन करणेबाबतचा आदेश सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना दिले होते.

लोणीकाळभोर पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील गुन्हेगार यांना सदर आदेशाचे अनुषंगाने चेक करुन त्यांचेवर कारवाई करणे बाबतच्या सुचना आदेश श्री दत्तात्रय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी पोलीस स्टेशनचे सर्व्हेलन्स अधिकारी पोउपनिरी धायगुडे, पोउपनि हंबीर व स्टाफ यांना दिल्या त्यानुसार अभिलेखावरील गुन्हेगारांचा शोध घेतला असता रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार नामे **शुभम संजय धुमाळ, वय २२ वर्षे, रा. धुमाळ मळा, म्हस्कोबा मंदीर, थेऊर फाटा, ता. हवेली, जि.पुणे हा** गुंड साथीदारांसह कुंजीरवाडी, म्हातोबाची आळंदी, नायगाव फाटा, पुणे सोलापुर रोड परिसरात लोणीकाळभोर पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात वारंवार गुन्हे करीत असतो. त्याची सर्वसामान्य जनतेमध्ये घबराहट, भिती व मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्याचे गुंड व दहशती कृत्यामुळे व तो सतत आपले गुंड सदस्यांसह गुन्हे करीत असलेने त्यांचेविरुध्द नागरीक तक्रार देण्यासाठी पुढे येत नाहीत. अशी माहिती मिळाली.

सदर माहितीचे आधारे श्री दत्तात्रय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी **शुभम संजय धुमाळ, वय २२ वर्षे, रा. धुमाळ मळा, म्हस्कोबा मंदीर, थेऊर फाटा, ता. हवेली, जि. पुणे** याचे तडीपारीचा प्रस्ताव तयार करुन मा.पोलीस उपायुक्त परि. ०५, पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख, यांचेकडे पाठविला होता. मा. पोलीस उपायुक्त परि. ५, पुणे शहर यांनी सदरचे प्रस्तावाची पडताळणी करुन दिनांक ०४/०७/२०२३ रोजी त्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१)(अ)(ब) प्रमाणे पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे जिल्हयातुन २ वर्षाकरिता तडीपार करण्याचा आदेश पारित केला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर, श्री.रंजन कुमार शर्मा, मा.पोलीस उपआयुक्त परि. ०५, पुणे शहर श्री. विक्रांत देशमुख,मा सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर श्रीमती अश्विनी राख, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रय चव्हाण, पोलीस निरीक्षक, (गुन्हे) श्री.सुभाष काळे, पोउपनिरी गोरे, पोउपनिरी किरण धायगुडे, पोलीस अंमलदार गणेश सातपुते, संदिप धनवटे, तेज भोसले यांनी केली आहे.